# Annual Return on cases of Sexual Harassment

**Period : 1st April, 2020 to 31st March, 2021**

Name of the College : **Santosh Bhimrao Patil Arts,Commerce & Science College, Mandrup, Tal.S.Solapur, Dist.Solapur**

| Sr.No. | | Number of Cases |
|---|---|---|
| 1 | Number of complaints of Sexual harassment received in the year | Nil |
| 2 | Number of complaints disposed off during the year | Nil |
| 3 | Number of cases pending for more than 90 days | Nil |
| 4 | Number of workshops on awareness programmes against sexual harassment conducted during the year | 3 |
| 5 | Nature of action | Nil |

Principal
Santosh Bhimrao Patil Arts, Comm.
& Science College, Mandrup

Scanned with OKEN Scanner

सत्र 2020-2021

# संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप

## अंतर्गत तक्रार निवारण समिती आयोजित

## जागतिक महिला दिन उपक्रम अहवाल

आमच्या महाविद्यालयात बुधवार दि.१०/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने सावित्रीबाई फुले स्मृतीदिन व जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोलापूर येथील विधी सेवा प्राधीकरणच्या रिटेनर लॉयर्स ॲड.देवयानी किणगी यांचे आभासी प्रणालीद्वारे महिलांचे सबलीकरण व स्वसंरक्षण या विषयावर व्याख्यान पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे होते तर प्रमुख उपस्थिती मंद्रुप पोलीस स्टेशनचे स.पो.नि. नितीन थेटे यांची होती.

प्रारंभी प्रास्ताविक अंतर्गत तक्रार निवारण समिती समन्वयक प्रा.श्रीमती बी.एस.कोरे यांनी केले. अतिथी परिचय प्रा.विजय साळवे यांनी करुन दिला. मार्गदर्शन करताना ॲड.किणगी म्हणाल्या की. मुलींनो स्पष्टपणे बोलायला शिका, मदत मागायला घाबरु नका, तुमच्यामध्ये आत्मविश्वास नसेल तर कायदयाचा उपयोग होत नाही. त्यामुळे खंबीरपणे अन्यायावर मात करायला शिका. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांनी मुलींनी अन्यायाबाबत धीटपणे प्रतिकार केला पाहिजे. वर्तणूक चांगली ठेवली पाहिजे. कुटूंबीयांनी मुलींना विश्वासात घेवून सहकार्य केले पाहिजे असे मत व्यक्त केले. यावेळी स.पो.नि.नितीन थेटे यांनी ही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विजय साळवे यांनी केले तर आभार रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.जवाहर मोरे यांनी मानले. या कार्यक्रमामध्ये एकूण ७६ जणांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रा.से.यो.समिती, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप (शिक्का)

प्राचार्य,
संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप.

Scanned with OKEN Scanner

# संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,मंद्रुप

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समिती आयोजित

## सावित्रीबाई फुले स्मृतीदिन व जागतिक महिला दिनानिमित्त

## व्याख्यान (ऑनलाईन)

**बुधवार**

**दि.१०/०३/२०२१**

**प्रमुख वक्ते :- मा.ॲड.देवयानी किणगी**
**(जिल्हा न्यायालय,सोलापूर)**

**विषय :- महिलांचे सबलीकरण,स्वसंरक्षण**

**अध्यक्ष :- प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे**

## कार्यक्रमपत्रिका

- **प्रास्ताविक** : प्रा.श्रीमती बी.एस.कोरे (समन्वयक)
- **अतिथी परिचय** : प्रा.विजय साळवे
- **मनोगत** : मा.नितीन थेटे (सपोनि,पोलीस स्टेशन,मंद्रुप)
- **मार्गदर्शन** : मा.ॲड.देवयानी किणगी (जिल्हा न्यायालय,सोलापूर)
- **अध्यक्षीय समारोप** : प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे
- **आभार** : प्रा.जवाहर मोरे (रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी)
- **सूत्रसंचालन** : प्रा.विजय साळवे

पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान
मंद्रुप

Scanned with OKEN Scanner

दै. माणदेश नगरी 10/3/2021

# मुलींमध्ये आत्मविश्वास नसेल तर कायद्याचा उपयोग होत नाही : ॲड. देवयानी किणगी

**मंद्रुप/ प्रतिनिधी :**

मुलींनो स्पष्टपणे बोलायला शिका, मदत मागायला घाबरू नका. मुलींवर चुकीचा प्रसंग ओढवल्यास पालकांनी मुलींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. मुलींमध्ये आत्मविश्वास असावा. तो नसेल तर कायद्याचा उपयोग होत नाही, असे प्रतिपादन विधी सेवा प्राधिकरणच्या रिटेनर लॉयर्स ॲड. देवयानी किणगी यांनी केले. त्या मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात जागतिक महिला दिन व सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त आयोजित महिलांचे सबलीकरण व स्वसंरक्षण या विषयावरील व्याख्यानात बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे होते. राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने आभासी प्रणालीद्वारे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

पुढे बोलताना ॲड. किणगी म्हणाल्या की, महाविद्यालय, शाळा, नोकरी आणि कामाच्या ठिकाणी जर महिलांवर अत्याचार होत असेल तर त्यांनी तक्रार केली पाहिजे. ती ९० दिवसांच्या आत केली पाहिजे. अश्लील शेरेबाजी, सार्वजनिक ठिकाणी छेडछाड, अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवणे अशा गुन्ह्यात कठोर शिक्षा होते. बहुतांश कायदे स्त्रियांच्या बाजूने आहेत.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे म्हणाले, मुलींबाबत आजही दुजाभाव दिसून येतो. मुलींनी अन्याय होत असेल तर धीटपणे प्रतिकार केला पाहिजे. अन्याय सहन करू नये. आपले म्हणणे नीटपणे मांडता आले पाहिजे. स्त्री आणि पुरुषांनी वर्तणूक चांगली ठेवली तर समाजातील दुर्घटना टळतील. कुटुंबीयांनी मुलींना विश्वासात घेऊन सहकार्य करावे. अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या समन्वयक प्रा. श्रीमती बी. एस. कोरे यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. जवाहर मोरे यांनी आभार मानले. प्रा. विजय साळवे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. के. यू. गरड यांनी तांत्रिक सहाय्य केले. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

दिनांक १० मार्च २०२१ (राजस्व) ३

# मुलींमध्ये आत्मविश्वास नसेल तर कायद्याचा उपयोग होत नाही:ॲड.देवयानी किणगी

दक्षिण सोलापूर (अशोक सोनकंटले): मुलींनो स्पष्टपणे बोलायला शिका, मदत मागायला घाबरू नका. मुलींवर चुकीचा प्रसंग ओढवल्यास पालकांनी मुलींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. मुलींमध्ये आत्मविश्वास असावा. तो नसेल तर कायद्याचा उपयोग होत नाही, असे प्रतिपादन विधी सेवा प्राधिकरणच्या रिटेनर लॉयर्स ॲड. देवयानी किणगी यांनी केले. त्या मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात जागतिक महिला दिन व सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त आयोजित महिलांचे सबलीकरण व स्वसंरक्षण या विषयावरील व्याख्यानात बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. एम.भांजे होते. तर प्रमुख उपस्थिती मंद्रुप पोलीस स्टेशनचे सपोनि नितीन थेटे यांची होती. राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने आभासी प्रणालीद्वारे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.पुढे बोलताना ॲड. किणगी म्हणाल्या की, महाविद्यालय, शाळा, नोकरी आणि कामाच्या ठिकाणी जर महिलांवर अत्याचार होत असेल तर त्यांनी तक्रार केली पाहिजे. ती ९० दिवसांच्या आत केली पाहिजे. अश्लील शेरेबाजी, सार्वजनिक ठिकाणी छेडछाड, अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवणे अशा गुन्ह्यात कठोर शिक्षा होते. बहुतांश कायदे स्त्रियांच्या बाजूने आहेत.यावेळी नितीन थेटे यांनीही यथोचित मनोगत व्यक्त केले.अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. बी.एम.भांजे म्हणाले, मुलींबाबत आजही दुजाभाव दिसून येतो. मुलींनी अन्याय होत असेल तर धीटपणे प्रतिकार केला पाहिजे. अन्याय सहन करू नये. आपले म्हणणे नीटपणे मांडता आले पाहिजे. स्त्री आणि पुरुषांनी वर्तणूक चांगली ठेवली तर समाजातील दुर्घटना टळतील. कुटुंबीयांनी मुलींना विश्वासात घेऊन सहकार्य करावे. अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या समन्वयक प्रा.श्रीमती बी. एस. कोरे यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. जवाहर मोरे यांनी आभार मानले. प्रा. विजय साळवे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. के. यू.गरड यांनी तांत्रिक सहाय्य केले. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप


Scanned with OKEN Scanner

C.B. Khedgi's B.Sci.,
R.V. Comm. & R.J. Arts College, Akkalkot
&
Santosh Bhimrao Patil Arts, Comm. & Sci. College,
Mandrup

(IQAC,ICC and Antiragging Committee)
Jointly Organizing

# WEBINAR on

## Ragging and Psychological Stress Management



JANUARY 21 | THURSDAY | 10 AM

Chief Guest
**Dr. V. Metan**
Chairman,
Youth Hostel Association of India, Solapur.

**Dr.B.M.Bhanje (SBPM)**
Principal

**Dr.G.S.Dhabale (CBK)**
Principal (Add Charge)

**Co-ordinators**

**Internal Complaint Cell**
Mrs.J.R.Birajdar (CBK)
Mrs.B.S.Kore (SBPM)

**Antiragging Committee**
Dr. S.C. Advitot (CBK)
Dr. S.N. Kadam (SBPM)

**IQAC**
Mrs. S.M. Paranjape (CBK)
Dr. C.S. Mulage (SBPM)

मंद्रुप

Scanned with OKEN Scanner

# संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप

दि.२१/०१/२०२१

## अंतर्गत तक्रार निवारण समिती आयोजित

## वेबिनार - रॅगिंग आणि मानसिक ताण व्यवस्थापन

### अहवाल

संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,मंद्रुप व सी.बी.खेडगीज महाविद्यालय,अक्कलकोट यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत आयोजित **रॅगिंग आणि मानसिक ताण व्यवस्थापन** या विषयावर ऑनलाईन वेबिनारचे आयोजन दि.२१/०१/२०२१ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते/व्याख्याते म्हणून सोलापूरचे सुप्रसिध्द अस्थिरोगतज्ञ तथा चेअरमन युथ होस्टेल असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर युनिटचे डॉ.व्यंकटेश मेतन हे होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे होते.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सौ.जे.एस.बिराजदार यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.एस.सी.आडवीतोट यांनी केले. मार्गदर्शन करताना डॉ.व्यंकटेश मेतन यांनी विद्यार्थ्यांनी तणावांचे व्यवस्थापन उत्तमरित्या केले तरच जीवनातील कोणत्याही आव्हांनांना सक्षमपणे सामोरे जाल व स्वत:चे जीवन आनंदमय होईल. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचे छळ ,त्रास सहन न करता योग्य ठिकाणी त्याची तक्रार केली तरच मानसिक तणावापासून स्वत:ची सुटका होईल असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांनी आपल्या देशात अनेक प्रकारचे कायदे यासाठी कार्यरत असून न घाबरता विद्यार्थ्यांनी याबाबत तक्रार करावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.संध्या इंगळे यांनी केले तर आभार अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या समन्वयक प्रा.श्रीमती बी.एस.कोरे यांनी मानले. या कार्यक्रमात १०९ पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते.

संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय ★ मंद्रुप

Scanned with OKEN Scanner

# अहवाल

आमच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी महाविद्यालयाच्या परिसरात एकूण १३ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविले आहेत. सदर कॅमेरे चालू स्थितीत आहेत. व तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना ड्रेसकोड व ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले आहे.

प्राचार्य,
संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप.

Scanned with OKEN Scanner